# यावल महाविद्यालयात दीपस्तंभ तर्फे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन

यावल (वार्ताहार) जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक सहकारी समाजाचे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय यावल येथे, जळगाव येथील दीपस्तंभ फाउंडेशन तर्फे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनाचा कार्यक्रम घेण्यात आला. हा कार्यक्रम प्राचार्य डॉ.संध्या सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. यामध्ये दीपस्तंभ च्या वतीने योगेश चांदणे यांनी 'स्पर्धा परीक्षा व अवांतर वाचन 'या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष उपप्राचार्य प्रा ए पी पाटील हे होते . प्रा ए पी पाटील यांनी एमपीएससी व यूपीएससी परीक्षेसाठी अवांतर वाचनाव्यतिरिक्त किमान दहा तास अभ्यास करावा असे मत मांडले. या कार्यक्रमास उपप्राचार्य प्रा.संजय पाटील, उपप्राचार्य प्रा. एम डी खैरनार, प्रा. डॉ.पी व्ही पावरा, प्रा. डॉ.ए जी भंगाळे उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. ई आय सावकार यांनी केले व आभार प्रा. डॉ.एस पी कापडे यांनी मानले. सदर कार्यक्रमाला महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षिकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.




करीअर कट्टा
अध्यक्ष :
प्रमुख वक्ते